**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - वेतन - २०१९/अशा.महा./०८/वेतनपथक, पुणे दिनांक - ११ ऑक्टोबर, २०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

२. कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे

**विषय - वेतन अनुदान माहे ऑक्टोबर, २०१९.**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोबर, २०१९ चे वेतन अनुदानाचे एचटीई सेवार्थ प्रणालीमधील मधील देयक आणि विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती तयार करुन सदरहू माहिती खाली नमूद केलेल्या ठिकाणी दिनांकास व वेळेत सादर करावी.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | १४ ऑक्टोबर, २०१९ | तुळजाराम चतुरचंद महा, बारामती | सकाळी १०.३० ते दुपारी २.०० पर्यंत |
| २ | पुणे जिल्हा | १४ ऑक्टोबर, २०१९ | | |
| ३ | अकृषी व अभिमत विद्यापीठे | १४ ऑक्टोबर, २०१९ | | |
| ४ | अहमदनगर | १५ ऑक्टोबर, २०१९ | पद्मश्री विखे पाटील महा, प्रवरानगर | |
| ५ | नाशिक | १२ ऑक्टोबर, २०१९ | एच पी टी महाविद्यालय, नाशिक | |

**तसेच ज्या कर्मचा-यांचा समावेश अजूनही एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये करण्यात आलेला नाही त्या कर्मचा-यांचेदेखील वेतनपत्रक स्वतंत्ररित्या सादर करावे.**

माहे ऑक्टोबर, २०१९ चे वेतन देयक सादर करतांना अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेसाठी (डी.सी. पी. एस.) कर्मचा-यांची नोव्हेंबर, २००७ या महिन्याची कपात करावयाची असून त्यासाठी **महागाई भत्त्याचे ०९ टक्के दराने परिगणन करावे.**

माहे ऑक्टोबर, २०१९ चे वेतन देयक सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणा-या कर्मचा-यांचे बाबतीत  महागाई भत्त्याच्या १५४ टक्के दराने आणि सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणा-या कर्मचा-यांचे बाबतीत महागाई भत्त्याच्या ९ टक्के दराने परिगणित करण्यात यावे.

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेऊन माहे ऑक्टोबर, २०१९ च्या वेतन देयकासाठीची एचटीई सेवार्थ प्रणालीमधील **Outer** ची प्रत आणि फक्त **०६, ०७** या विवरणपत्राची माहिती Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये विवरणपत्रे तसेच माहे सप्टेंबर, २०१९ चे वेतनापेक्षा माहे ऑक्टोबर, २०१९ चे वेतनामध्ये बदल झालेले असल्यास वेतननिश्चितीचे आदेश तसेच बदली आदेश आणि रुजू आदेश याची माहिती सादर करण्यात यावी.  तसेच **वेतन देयकासोबत खालील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**उपयोगिता प्रमाणपत्र**

**प्रमाणित करण्यात येते की खाली नमूद केलेली माहिती अचूक असून त्याची खात्री मी स्वतः यासाठीच्या आवश्यक असणा-या सर्व नोंदवहया तपासून करुन घेतली आहे.  यामध्ये काही चुक आढळल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.**

| अ. क्र. | महिना | तपशील | सहसंचालक पुणे यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेतन खात्यामध्ये जमा केलेली रक्कम | प्रत्यक्ष वितरीत रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | | | | | | |
| ०२ | | | | | | |
| | | **एकूण** | | | | |

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन वर नमूद केलेल्या तारखांना आपण आपले महाविद्यालय/अकृषी आणि अभिमत विद्यापीठाचे माहे ऑक्टोबर, २०१९ चे वेतन देयक न चुकता सादर करावे.

**सही/-**
(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे